आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -रात्री ८.०५ वाजता

१७ डिसेंबर २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- राज्यघटना हा केवळ दस्ताऐवज नसून वंचितांच्या कल्याणाचा आणि राष्ट्रनिर्माणाचा प्रेरणास्रोत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं राज्यसभेत प्रतिपादन

- एक देश एक निवडणूक संदर्भातली घटनादुरुस्ती विधेयकं लोकसभेत सादर, संयुक्त संसदीय समितीकडे विधेयकं पाठवण्याची विरोधकांची मागणी

- फ्रान्समध्ये चक्रीवादळामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये २२ जणांचा मृत्यू, १ हजार ४०० हून अधिक जण जखमी

**आणि**

- महिला क्रिकेटमधे भारताविरुद्धच्या मालिकेत दुसऱ्या टी-ट्वेंटी सामन्यात नाणेफेक जिंकून वेस्ट इंडिजचा क्षेत्र रक्षणाचा निर्णय

**<><><><><>**

आमच्या सरकारसाठी राज्यघटना ही केवळ दस्ताऐवज नाही तर, वंचितांच्या कल्याणाचा आणि राष्ट्रनिर्माणाचा प्रेरणास्रोत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज राज्यसभेत राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवानिमित्त झालेल्या विशेष चर्चेला उत्तर देत होते. आपलं संविधान, संविधानसभेची रचना, आणि संविधानरचनेची प्रक्रिया संपूर्ण जगातल्या संविधानांनमधे अनोखी आहे, असं ते म्हणाले.

आपल्या राज्यघटनेत मार्गदर्शक सूचनांच्या चौथ्या भागातल्या ४४ व्या कलमात समान नागरी कायद्याचा उल्लेख केला आहे. कारण आपलं संविधान सर्व धर्मांसाठी समान कायद्याच्या बाजूचं आहे, असं ते म्हणाले.

गेल्या ७५ वर्षात आपल्याप्रमाणेत अनेक देश स्वतंत्र झाले. मात्र तिथं लोकशाही यशस्वी झाल्याचं दिसत नाही. पण आपली लोकशाही खोल रुजलेली आहे. रक्ताचा एक थेंबही न सांडवता अनेक बदल आपण घडवून आणले. आर्थिक दृष्ट्या आपण कधीही स्वतंत्र होऊ शकणार नाही, असं त्यावेळी म्हणाऱ्यांना आपल्या देशातल्या जनतेनं आणि आपल्या संविधानानं चोख उत्तर दिलं आहे. आपण ब्रिटनला मागं टाकलं असून आज जगातली पाचवी मोठी अर्थव्यवस्था बनलो आहोत, असं ते म्हणाले.

संसदेच्या दोन्ही सभागृहांमधे झालेल्या चर्चा देशातल्या युवकांसाठी याबाबतीतलं शिक्षण देणाऱ्या ठरतील, असं शहा म्हणाले.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक संदर्भातली दोन विधेयकं आज लोकसभेत मांडण्यात आली. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल विधेयक मांडत असताना विरोधकांनी विधेयक मांडण्यावर मतदानाची मागणी केली. त्यावर २६९ सदस्यांनी विधेयक मांडण्याच्या बाजूने कौल दिला. तर १९८ सदस्यांनी विधेयक मांडण्याला विरोध केला. त्यात काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, सीपीआय एम आणि इतर विरोधी खासदारांचा समावेश होता. ही विधेयकं म्हणजे संविधानाच्या मूलभूत ढाच्यावर हल्ला असल्याचं सांगत त्यांचा मसुदा आधी संयुक्त संसदीय समितीकडे तपासण्यासाठी पाठवावा अशी मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी केली. विरोधकांचे आरोप खोडून काढताना अर्जुन राम मेघवाल यांनी देशाचे पहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाचा

दाखला दिला.संविधानाचं संघराज्य स्वरुप कोणीही बदलू शकत नाही असं ते म्हणाले. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वाखाली नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने एक देश एक निवडणूक संकल्पनेची अभ्यासपूर्ण तपासणी केली असून त्यात सर्व संबंधितांचं आणि तज्ञांचं मत विचारात घेतलं आहे, असं मेघवाल म्हणाले. काँग्रेसचे मनिष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, आणि द्रमुकचे टी आर बालू यांनी आपल्या भाषणात या विधेयकाला विरोध केला.

**<><><><><>**

एक देश एक निवडणूक विधेयकाला काँग्रेस, समाजवादी पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या सदस्यांनी विरोध केला आहे. संसदेच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलताना विविध पक्षांच्या खासदारांनी याबाबत प्रतिक्रीया दिल्या. एक देश एक निवडणूक विधेयकाला आपल्या पक्षाचा विरोध असून सभागृहात मांडण्यापूर्वी हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे छाननीसाठी पाठवावं अशी पक्षाची मागणी असल्याचं ज्येष्ठ काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सांगितलं. राष्ट्रवादी कांग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांनी देखील अशीच मागणी केली. हे विधेयक असंवैधानिक असून राज्यांचं महत्त्व कमी करणारं असल्याचा आरोप समाजवादी पार्टीचे धर्मेंद्र यादव यांनी केला. तर हे विधेयक संघराज्याच्या तत्वांच्या विरोधात असल्याचं माकपाचे जॉन ब्रिटास यांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

लोकसभेत आज ८७ हजार ७६२ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या. भारत हा जगात सर्वाधिक वृद्धी दर नोंदवणारा देश आहे. गेले ३ वर्ष देशाचा वृद्धीदर सरासरी ८ पूर्णांक ३ दशांश टक्के होता, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन

यांनी या संदर्भातल्या चर्चेला उत्तर देताना सांगितलं. केंद्र सरकारनं ११ लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च पायाभूत सुविधांवर करायचा ठरवला आहे. त्यामुळं येत्या काही वर्षात अर्थव्यवस्था आणखी मजबूत होईल, असं त्या म्हणाल्या. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या सरकारच्या तुलनेत राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळात किरकोळ, खाद्य आणि इंधन महागाई मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचं त्यांनी सांगितलं. युपीए सरकारच्या काळात महागाई दर १० टक्क्यांच्या वर होता. आता हा दर ५ टक्क्यांच्या खाली असल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं. स्वयंपाकाच्या गॅसच्या किंमती शेजारी देशांपेक्षा भारतात कमी आहेत. बेरोजगारीचा दर गेल्या ५ वर्षात निम्म्यावर आल्याचंही त्या म्हणाल्या.

**<><><><>**

करदात्यांना अधिक सेवा देण्याच्या उद्देशानं ४ नव्या उपक्रमांची घोषणा आज केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाचे अध्यक्ष संजय कुमार अगरवाल यांनी केली.  या चार उपक्रमांमध्ये नागरिकांची सनद, संपूर्ण करसंबंधित माहितीसाठी सुविधा केंद्र, सूचना करण्यासाठी व्यवसाय सुलभता टॅब आणि कर भांडारासाठी CBIC संग्रह यांचा समावेश आहे. यामुळे करसेवेमध्ये पारदर्शकता आणि विश्वास वाढीस लागेल. करदात्यांना सक्षम बनवून आणि त्यांच्या सूचनांचा समावेश करून, एक  सुलभ प्रणाली तयार केली जाईल, अशी माहितीही  त्यांनी दिली.

**<><><><>**

फ्रान्समध्ये मेयोत इथे चिडो चक्रीवादळामुळे झालेल्या दुर्घटनांमध्ये आतापर्यंत किमान २२ जणांचा मृत्यू झाला तर १ हजार ४०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. हिंदी महासागरातल्या मादागास्कर आणि मोझांबिक बेटांच्या किनाऱ्या दरम्यान मायोत हा द्वीपसमूह आहे. या चक्रीवादळामुळे किती नुकसान झालं आहे, याचा निश्चित आकडा अद्याप कळू शकलेला नाही. सध्या संबंधित

भागात बचावकार्य सुरू आहे. या चक्रीवादळाचा फटका मोझांबिकला देखील बसला असून यात आतापर्यंत ३४ जणांचा मृत्यू झाला आहे.

चिडो चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. अशा कठीण प्रसंगात भारत फ्रान्ससोबत असून त्याला सर्वतोपरी सहकार्य करायला तयार असल्याचं मोदी आपल्या संदेशात म्हणाले.

**<><><><><>**

बांगलादेशात संसदीय निवडणूक घेण्याची परवानगी निष्पक्ष काळजीवाहू सरकारला देणारी तरतूद तिथल्या उच्च न्यायालयाने पुनर्स्थापित केली आहे. बांगला देशच्या संविधानातली ही तरतूद १५व्या घटनादुरुस्तीनुसार हटवण्यात आली होती. ही घटनादुरुस्ती संविधानाच्या मूलभूत तत्वांशी फारकत घेऊन लोकशाहीशी तडजोड करणारी होती असं न्यायालयाने म्हटलं आहे. न्यायमूर्ती फरहा महबूब आणि न्यायमूर्ती देबाशीष रॅाय चौधुरी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. १९९६मधे बांगला देश नॅशनल पार्टीच्या खालिदा झिया निवडून आल्या तेव्हा काळजीवाहू सरकारने निवडणूक घेण्याची पद्धत मोडीत निघाली होती.

**<><><><><>**

ट्रॅव्हल एजंटकडून फसवणूक झाल्याने पाकिस्तानात अडकलेली एक भारतीय महिला २२ वर्षांनी मायदेशी परतली आहे. हमीदा बानो असं या मूळच्या मुंबईकर असलेल्या महिलेचं नाव असून त्यांना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून अटारी सीमेवर परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आलं. हमीदा यांना ट्रॅव्हल एजंटने नोकरीचं आमीष दाखवून त्यांची फसवणूक केल्याने त्या पाकिस्तानमधे सिंध प्रांतातल्या हैदराबाद इथे अडकल्या होत्या.

**<><><><><>**

विकसित भारतासमोरच्या आव्हानांची चर्चा करण्यासाठी मुंबईतल्या इंदिरा गांधी विकास संशोधन संस्थेत दोन दिवसीय परिषद पार पडली. यावेळी विकसित भारतासमोरची आव्हानं, त्यांना मिळणारं अर्थसहाय्य, या अर्थसहाय्याचं स्त्रोत याविषयी चर्चा झाल्याची माहिती नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांनी दिली. या चर्चांचा उपयोग धोरण निश्चितीसाठी होईल, असं ते म्हणाले. भारतासमोर आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात सुधारणा करणं हे मोठं आव्हान असल्याचं कॅलिफोर्निया विद्यापीठातले प्राध्यापक डोनाल्ड हन्ना म्हणाले. कामाच्या ठिकाणी स्त्री - पुरुष समानता, उत्पन्न वाढीसाठी तंत्रज्ञानाचा उपयोग आणि नैसर्गिक स्त्रोतांच्या वापरावरचे निर्बंध हटवणं आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, आज नवी मुंबईत डी वाय पाटील स्टेडिअमवर सुरु असलेल्या दुसऱ्या टी-ट्वेंटी सामन्यात वेस्ट इंडिजनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचरण केलं.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या १६ षटकात ५ बाद ११० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर - गावस्कर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या ब्रिस्बेन इथं सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात फॉलोऑन टाळण्यात  भारताला यश आलं. मात्र आज चौथ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारत पहिल्या डावात अजूनही १९३ धावांनी पिछाडीवर आहे.

आज सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं कालच्या ४ बाद ५१ धावांवरून आपला पहिला डाव पुढे सुरू केला.

**//<><><><><>//**